# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः12.11.2024** **वारःमंगळवार**

---

1. महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी; भाजपाचे वरिष्ठ नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी; तसंच कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांच्या राज्यात प्रचारसभा
2. झारखंड विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील मतदान उद्या.
3. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून दादरा, नगर हवेली आणि दमण दीवच्या दौऱ्यावर
4. इफ्फीमध्ये दिला जाणारा 'सत्यजित रे जीवनगौरव पुरस्कार' यंदा ऑस्ट्रेलियन चित्रपट निर्माते फिलिप नोईस यांना जाहीर आणि
5. महिलांच्या आशियाई अजिंक्यपद हॉकी स्पर्धेत भारताची विजयी सलामी, मलेशियावर 4-0 अशी मात

**<u>प्रचार सत्ताधारी</u>**

महाराष्ट्रातल्या विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी अवघे काही दिवस राहिले आहेत; त्यामुळे विविध राजकीय पक्षांचा प्रचार शिगेला पोहोचला आहे. पंतप्रधान आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी आज संध्याकाळी पुण्यात प्रचार सभा घेणार आहेत. तत्पूर्वी आज दुपारी चिमुर आणि नंतर सोलापूर इथंही मोदी महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी जाहीर सभा घेणार आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज मुंबईत दोन सभांना संबोधित करतील. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राहुल गांधी हे देखील चिखली आणि गोंदिया मतदारसंघातल्या काँग्रेस उमेदवारांच्या प्रचारासाठी सभा घेणार आहेत. शिवसेना नेते आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल जालना जिल्ह्यात प्रचारसभा घेतल्या. काँग्रेससह महाविकास आघाडीचा जाहीरनामा फसवा असल्याची टीका भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपूर इथं केली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांची काल नंदूरबारमध्ये प्रचारसभा झाली.

**<u>प्रचार विरोधक</u>**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते शरद पवार यांनी धुळे जिल्ह्यात प्रचारसभा घेतली. शेतकरी आत्महत्या, महिला सुरक्षा इत्यादी मुद्द्यांवरुन त्यांनी महायुती सरकारवर टीका केली. महायुतीच्या काळात राज्यामध्ये अंधार झाल्याची टीका करत हा अंधार दूर करण्यासाठी मी मशाल घेऊन आलो आहे, असं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे वाशीम इथल्या प्रचारसभेत म्हणाले. छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री काँग्रेस नेते भूपेश बघेल यांची गडचिरोली जिल्ह्यात कोरची इथं प्रचारसभा झाली. भाजपाला विधानसभा निवडणुकीत पराभव दिसू लागला आहे; त्यामुळेच जाती-धर्मात फूट पडणारे मुद्दे उपस्थित करून ते जनतेची

दिशाभूल करत आहेत, अशी टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी काल यवतमाळ जिल्ह्यातल्या सभेत केली.

**<u>प्रचार इतर</u>**

वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी वाशिम जिल्ह्यात प्रचार केला. यावेळी त्यांनी काँग्रेस, भाजपा यांच्यासह त्यांच्या मित्रपक्षांवर टीका केली.

**<u>झारखंड निवडणूक</u>**

झारखंडमध्ये विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात 43 मतदारसंघांसाठी उद्या मतदान होणार आहे. यासाठीची सर्व व्यवस्था करण्यात आली असून राज्यभरात एकंदर 15 हजार 344 मतदान केंद्रे उभारण्यात आली आहेत. यामध्ये 225 संवेदनशील मतदान केंद्रांपैकी 194 मतदान केंद्रावर काल भारतीय वायुसेनेच्या हेलिकॉप्टरद्वारे निवडणूक विभागाचे अधिकारी पोहोचले आहेत, तर उर्वरित 30 बूथचे अधिकारी आज पाठवले जातील. मतदान प्रक्रिया सुरळीतपणे व्हावी यासाठी सुरक्षा दलाच्या दोनशेहून अधिक तुकड्या संबंधित भागात तैनात करण्यात आल्या आहेत. या विधानसभा निवडणुकीत 73 महिलांसह 683 उमेदवार रिंगणात असून एक कोटी 37 लाख मतदार या उमेदवारांचं राजकीय भवितव्य ठरवतील. झारखंडमध्ये 20 नोव्हेंबरला दुसऱ्या टप्प्यातील 38 मतदारसंघात मतदान होणार आहे. आणि 23 नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे.

**<u>पोटनिवडणूक</u>**

11 राज्यांमधील 33 विधानसभा मतदारसंघ आणि केरळच्या वायनाड लोकसभा जागेसाठी होणाऱ्या पोटनिवडणुकांसाठीही काल प्रचाराचा समारोप झाला. राजस्थानमधील सात, पश्चिम बंगालमधील सहा, आसाममधील पाच, बिहारमधील चार, कर्नाटकातील तीन आणि मध्य प्रदेश आणि सिक्कीममधील प्रत्येकी दोन जागांसाठी उद्या पोटनिवडणूक होणार आहे. याशिवाय केरळ, छत्तीसगड, गुजरात, मेघालयमध्ये प्रत्येकी एका जागेसाठी विधानसभेची पोटनिवडणूक होणार आहे.

**<u>राष्ट्रपती</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून दादरा आणि नगर हवेली आणि दमण आणि दीव या केंद्रशासित प्रदेशाचा तीन दिवसीय दौऱ्यावर रवाना होत आहेत. दौऱ्याच्या पहिल्या दिवशी राष्ट्रपती जामपूर इथलं पक्षीगृह, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय आणि दमण इथल्या एनआयएफटी संस्थेला भेट देतील. दुसऱ्या दिवशी त्या सिल्वासा इथल्या नमो वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संस्थेला भेट देणार आहेत. आपल्या दौऱ्यात राष्ट्रपती विविध शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थी आणि प्राध्यापकांशी संवाद साधणार असून त्या झंडा चौक शाळेचं उद्घाटन आणि सिल्वासा इथं एका सार्वजनिक कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. त्या दीव इथल्या आयएनएस खुकरी स्मारकालाही भेट देणार आहेत.

**<u>राष्ट्रपती-सरन्यायाधीश-भोजन</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशाचे नवनिर्वाचित सरन्यायाधीश, न्यायमूर्ती संजीव खन्ना यांच्या स्वागतासाठी काल रात्री नवी दिल्लीत स्नेहभोजन समारंभाचे आयोजन केले होते. यावेळी उपराष्ट्रपती जगदीप

धनखड, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस. जयशंकर, माजी सरन्यायाधीश न्यायमूर्ती डी. वाय चंद्रचूड यांच्यासह सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश आणि उच्च न्यायालयांच्या मुख्य न्यायमूर्तींसह अन्य मान्यवर उपस्थित होते.

**<u>मोदी-मॉरिशस</u>**

मॉरिशसमधील निवडणूकीतील विजयाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डॉक्टर नवीन रामगुलाम यांचं अभिनंदन केलं आहे. मॉरिशसचं नेतृत्व करण्यासाठी त्यांना शुभेच्छा देत पंतप्रधान मोदी यांनी डॉक्टर रामगुलाम यांना भारत भेटीचं निमंत्रण दिलं. तसंच दोन्ही देशातील सहकार्य सक्षम करण्यासाठी एकत्र काम करण्यास उत्सुक असल्याचं मोदी म्हणाले.

**<u>रशिया उपपंतप्रधान मोदी भेट</u>**

रशियाचे पहिले उपपंतप्रधान डेनिस मँतुरोव यांनी काल नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान, त्यांनी दोन्ही देशातील व्यापार,आर्थिक संबंध, ऊर्जा आदी विविध क्षेत्रात परस्पर सहकार्य वाढविण्याविषयी सविस्तर चर्चा केली. मोदी यांनी रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन यांना शुभेच्छा देत भारत आणि रशियातील धोरणात्मक सहकार्याचे संबंध दृढ करण्यासाठी दोन्ही बाजूंनी झालेल्या प्रयत्नांची यावेळी प्रशंसा केली.

**<u>मोदी-इगस उत्सव</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नवी दिल्लीत उत्तराखंडचे लोकसभा खासदार अनिल बलूनी यांच्या निवासस्थानी आयोजित करण्यात आलेल्या इगास उत्सवाच्या सोहळ्यात सहभाग घेतला. यानिमित्तानं मोदींनी समाजमाध्यमावर उत्तराखंडच्या जनतेचं अभिनंदन केलं,तसंच इगासची परंपरा जिवंत ठेवण्यासाठी त्यांनी उत्तराखंडमधील लोकांच्या प्रयत्नांची प्रशंसा केली. देवभूमीचा हा वारसा पुढेही बहरत राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. केंद्रीय मंत्री आणि भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा हे देखील या सोहळ्यात सहभागी झाले होते.

**<u>इफ्फी</u>**

55 वा भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव अर्थात इफ्फी येत्या 20 तारखेला गोव्यात सुरू होत आहे. माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉक्टर एल. मुरुगन यांनी काल नवी दिल्लीत घेतलेल्या पत्रकार परिषदेत माध्यमांच्या प्रतिनिधींना महोत्सवाची सविस्तर माहिती दिली. या महोत्सवात 81 देशांमधले 180 पेक्षा जास्त चित्रपट पाहण्याची संधी रसिकांना मिळणार आहे. यंदाचा सत्यजीत राय जीवनगौरव पुरस्कार ऑस्ट्रेलियातले चित्रपट निर्माते फिलिप नॉयस यांना प्रदान करण्यात येणार असल्याचं मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांनी सांगितलं. यंदाच्या महोत्सवाची सुरुवात 'बेटर मॅन' या ऑस्ट्रेलियन चित्रपटानं होणार आहे.

**<u>सीतारामन</u>**

केंद्रीय वित्त आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्री निर्मला सीतारामन यांनी काल नवी दिल्ली इथं एशियन इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट बँक अर्थात AIIB च्या शिष्टमंडळासोबत बैठक घेतली. गेल्या काही वर्षांत बँकेची झालेली उल्लेखनीय वाढ आणि कामगिरीबद्दल अर्थमंत्र्यांनी बँकेचं कौतुक केलं.

बँकेची प्रशंसा करतानाच त्यांनी भारताच्या भक्कम स्थूल आर्थिक नियोजनामधील मूलभूत आर्थिक गोष्टी आणि डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा निर्माण करण्यात तसंच त्याचा उपयोग करण्यासाठी वापरण्यात आलेल्या प्रेरणादायी भारतीय नेतृत्वाचा उल्लेख केला. बँकेनं हवामान अनुकूलता आणि लवचिकता, पायाभूत सुविधांचा विकास, ऊर्जासुरक्षा, शहरी विकास आणि भारताच्या पुढील पिढीतील सुधारणांसाठी सहाय्य या प्राधान्य क्षेत्रांमध्ये आपली गुंतवणूक वाढवावी, अशी सूचनाही सीतारामन यांनी केली.

**<u>आयआयटी</u>**

भारतीय तंत्रशिक्षण संस्था अर्थात आयआयटी मुंबई मध्ये काल राष्ट्रीय शिक्षण दिन साजरा करण्यात आला. त्यानिमित्त निवडक प्राध्यापकांना संशोधन प्रकाशन पुरस्कार आणि प्रभावशाली संशोधन पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आलं. प्रत्येक संशोधन पुरस्कारामध्ये सन्मानपत्र, 5000 रुपये रोख पुरस्कार आणि पाच लाख रुपयांचे अंतर्गत संशोधन अनुदान यांचा समावेश आहे. स्वतंत्र भारताचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या जयंतीनिमित्त देशात दरवर्षी 11 नोव्हेंबर रोजी राष्ट्रीय शिक्षण दिन साजरा केला जातो. यावेळी बोलताना प्रमुख पाहुण्या, एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या माजी कुलगुरू प्रा. वसुधा कामत यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा आशय आणि त्यातून शिक्षण व्यवस्थेत कसा बदल घडू शकतो याविषयी माहिती दिली.

**<u>कोलकाता-सुनावणी</u>**

कोलकाता मधल्या आरजी कार वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रशिक्षणार्थी डॉक्टरच्या बलात्कार आणि हत्या प्रकरणाची सुनावणी काल कोलकाता इथल्या सियालदह न्यायालयात सुरू झाली. याआधी केंद्रीय तपास यंत्रणा अर्थात सीबीआयनं या प्रकरणातील मुख्य आरोपी संजय राय याच्याविरुद्ध आरोपपत्र सादर केलं होतं. या खटल्याची प्रक्रिया न्यायालयात दररोज सुरू राहणार आहे.

**<u>महिला-हॉकी</u>**

महिलांच्या आशियाई अजिंक्यपद हॉकी स्पर्धेचं उद्घाटन काल बिहारमध्ये राजगीर इथं मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्या हस्ते झालं. कालच्या आपल्या पहिल्या सामन्यात भारतीय महिला संघानं मलेशियावर 4-0 असा विजय मिळवला. दरम्यान, जपान आणि दक्षिण कोरिया यांच्यात झालेल्या उद्घाटनाच्या सामन्यात 2-2 अशी बरोबरी झाली. अन्य एका सामन्यात चीननं थायलंडच्या संघावर 15-0 असा दणदणीत विजय मिळवला.

# याबरोबरच राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.